30-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 6/29/2025 11:41 PM Page 1

उत्तराखंडमध्ये ढगफुटी, अनेक कामगार बेपत्ता

डेहराडून, दि. २९ :

उत्तराखंडमध्ये शनिवारी रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने रौद्र रूप धारण केलेय. राज्याच्या उत्तरकाशीमध्ये झालेल्या ढगफुटीमुळे जनजीवन अस्तव्यस्त झाले असून बांधकामाच्या साईटवरील ८ ते १० कामगार बेपत्ता असल्याची माहिती पुढे आलीय.

यासंदर्भात बडकोटचे पोलिस अधिकारी दीपक कठेत यांनी सांगितले की, यमुनोत्री महामार्गावर ढगफुटी झाल्याची माहिती मिळाली होती. पथकाने घटनास्थळी पोहोचल्यावर पाहिले की, येथे रस्त्याच्या आणि इतर कामांमध्ये गुंतलेले काही लोक तंबू टाकून राहत होते. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे ते वाहून गेले आहेत. आतापर्यंत ८ ते १० जण बेपत्ता झाल्याची माहिती आहे. हे सर्व नेपाळी वंशाचे आहेत. तर उत्तरकाशीचे जिल्हाधिकारी प्रशांत आर्य म्हणाले की, शनिवारी मध्यरात्रीनंतर यमुनोत्री महामार्गावर पालीगाड ओजरी डाबरकोट दरम्यान ढगफुटी झाल्याने मोठे नुकसान झाले आहे. या दुर्घटनेत हॉटेलचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी राहणारे ८ ते १० कामगार बेपत्ता झाले. यमुनोत्री मार्गावरही परिणाम झाला आहे. बेपत्ता मजुरांच्या शोधासाठी प्रशासनाचे पथक आणि एसडीआरएफकडून बचावकार्य सुरू असल्याचे आर्य यांनी सांगितले.

ढगफुटीनंतर यमुनोत्री महामार्ग सिलाई बँडसह अनेक ठिकाणी बंद आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाचे पथक रस्ता मोकळा करण्याचे प्रयत्न करत आहे. तर, पाणी पातळीतही वाढ झाली आहे.यमुनोत्री महामार्गावरील स्याना चट्टीजवळ कुपडा कुनसाला मोटर मार्गावरील पुलाजवळ वरून मोठ्या प्रमाणात माती आणि दगड आल्याने यमुना नदीचा प्रवाह थांबला आणि येथे तलाव तयार होऊ लागला आहे. यामुळे स्थानिक नागरिक आणि यमुना नदीच्या काठावर राहणाऱ्या लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

गेल्या काही दिवसांपासून उत्तराखंडमध्ये मान्सून पूर्णपणे सक्रिय झाला आहे. आज रविवार पासून पुढील ३ दिवस राज्यातील ७ जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. तर इतर अनेक जिल्ह्यांमध्येही पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. आगामी १ जुलै पर्यंत राज्यातील डेहरादूनसह टिहरी, पौडी, चंपावत, हरिद्वार, नैनिताल आणि उधमसिंह नगर जिल्ह्यातील काही भागांमध्ये अतिवृष्टीसाठी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आल्याचे हवामान विज्ञान केंद्राचे संचालक बिक्रम सिंह यांनी सांगितले.

पान १ वरून

दोन टप्प्यांत जातीय जनगणनेचा केंद्राचा निर्णय

जनगणनेनंतर नवीन सीमांकन आयोग स्थापन केला जाईल. याआधी १९५१, १९६१ आणि १९७१ च्या जनगणनेच्या आधारावर सीमांकन झाले होते. मात्र, १९७६ नंतर सीमांकन थांबवण्यात आले कारण उत्तर भारतातील वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि दक्षिण भारतातील नियंत्रणातील वाढ यामुळे वाद निर्माण झाला होता.

२०२७ च्या जनगणनेनंतर जो डेटा मिळेल, त्यावर पुढील सीमांकन आणि आरक्षण लागू होईल. मात्र, अंतिम डेटा आणि आयोगाच्या प्रक्रियेमुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत मोठे बदल दिसणार नाहीत. त्यानंतर मात्र, हा डेटा निर्णायक ठरणार आहे.

गृह मंत्री अमित शहा यांनी यासंदर्भात आश्वासन दिले आहे की, सीमांकन प्रक्रियेत दक्षिणेकडील राज्यांच्या चिंतेचा सन्मान केला जाईल आणि योग्य वेळी सर्व राज्यांशी चर्चा करण्यात येईल.

जातगणनेचा निर्णय राजकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण मानला जात आहे. अनेक विरोधी पक्षांनी याची दीर्घकालीन मागणी केली होती. एप्रिल २०२५ मध्ये केंद्र सरकारने यास मान्यता दिली आणि आता ती प्रत्यक्षात येणार आहे.

२०२७ मध्ये होणारी ही डिजिटल, दोन टप्प्यांतली जातगणना भारताच्या लोकशाही, विकास आणि प्रतिनिधित्वासाठी ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. सामाजिक न्यायाच्या पुढील पर्वाची पायाभरणी म्हणून ही जनगणना पाहिली जात आहे.

कानोळकर वाडा येथील गटारे साफ करा : ग्रामस्थांची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

साळ,दि.२९ : नानोडा कानोळकरवाडा येथील काही गटारे अजूनही पंचायतीने साफ न केल्याचे चित्र दिसत आहे. पावसाळा सुरू झाल्याने गटारे अर्धवट स्थितीत तसेच ठिकठिकाणी वेली, झुडपे वाढलेली दिसते आहेत. गटारे साफ न झाल्याने काही ठिकाणी रस्त्यावरून पाणी वाहत आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना याचा त्रास होत आहे. काही ठिकाणची गटारे पंचायतीने साफ केली असून काही ठिकाणी साफ करणे बाकी असल्याने ती साफ करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

बलराम अ डे केअर शाळेच्या विद्यार्थ्यांचे चित्रकला स्पर्धेत यश

■ *टीम दैनिक हेराल्ड*

आगोंद, दि. २९: मोखर्ड श्रीस्थळ, काणकोण येथील बलराम-अ डे केअर शाळेचा इयत्ता सातवी वर्गातील विद्यार्थी गौतम गांवकर याने जागतिक पर्यावरण दिन २०२५ निमित्त आयोजित राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले.

या स्पर्धेत संपूर्ण गोवा राज्यातून सुमारे ४५० विद्यार्थ्यांनी पोस्टर आणि चित्रकला स्पर्धेत सहभागी झाले होते. ही स्पर्धा गोवा विज्ञान केंद्र, मिरामार आणि गोवा शासन पर्यावरण व हवामान बदल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. विद्यालयातून इयत्ता नववी वर्गातील तेजस्वी गौंडर व इयत्ता आठवी वर्गातील दक्ष वेळीप यांनी पोस्टर स्पर्धेत, इयत्ता सहावी वर्गातील दिशा वेळीप आणि सातवी वर्गातील अनिश वेळीप व गौतम गांवकर यांनी चित्रकला स्पर्धेत सहभाग घेतला.

कुमार गौतम गांवकर यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाल्याबद्दल मार्गदर्शक शिक्षिका सिध्दी गांवकर, शिक्षिका श्रद्धा नाईक, व शिक्षक गंगेश वेळीप यांचे शाळेचे व्यवस्थापक, पालक, मुख्याध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.

मोखर्ड श्रीस्थळ, काणकोण येथील बलराम-अ डे केअर शाळेचा सातवी वर्गातील विद्यार्थी गौतम गांवकर व गोवा राज्य पर्यावरण व हवामान विभागाचे अधिकारी.

राधाकृष्ण विद्यालयात पथ नाट्य शिबीर उत्साहात

राधाकृष्ण विद्यालयात पथ नाट्य शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांसोबत शिक्षक व इतर मान्यवर.

■ *टीम दैनिक हेराल्ड*

डिचोली, दि. २९: राधाकृष्ण विद्यालय डिचोली हायस्कूल व राष्ट्र सेवा दल गोवा शाखा यांच्या संयुक्त प्रयत्नातून राधाकृष्ण विद्यालय डिचोली हायस्कूल मध्ये साप्ताहिक पथनाट्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी सुमारे ३० विद्यार्थी सहभागी झाले होते.

शाळा सुटल्यानंतर दुपारच्या सत्रात चाललेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांनी नाट्य व पथनाट्य कसे करावे, कोणते हावभाव केव्हा करावे, प्रत्येक हालचालीला एक वेगळा असा अर्थ असतो व तो समजून कसा करावा. व्यक्तिगत भावना व सामाजिक भावना कशा लोकांसमोर कशा मांडाव्यात अशा अनेक विषयांवर चर्चा व प्रात्यक्षिक दाखवून पथनाट्य कार्य शाळेचे शिक्षक दामोदर कोळी (कोल्हापूर) यांनी या सर्व संकल्पना प्रात्यक्षिकासहित सादर करून व विद्यार्थ्यांतर्फे करून घेण्यात आल्या.

आपण माणूस म्हणून जगत असताना अनेक लोकांसमोर व त्यांच्याशी संपर्क येतो व आपण आपल्या एक मेकांशी भावनांचे आदान प्रदान करतो अशा वेळी आपल्याकडून इतरांच्या भावना समजून न दुखावता जगणे म्हणजेच माणुसकी आहे. व्यक्तिगत जीवनात समाजाचा मोठा वाटा असतो व समाजाला प्रबोधन करण्याचे पथनाट्य हे प्रभावी अस्त्र आहे. समाजाचे भान ठेवून आपण आपले विचार या कले द्वारे समजा समोर प्रभावीपणे मांडू शकतो असे दामोदर कोळी यांनी शिबिराच्या समारोपाच्या दिवशी सांगितले.

मनावरचा ताबा व शरीराचे संतुलन सांभाळून अभिनय करणारा नट हा पुढे मोठा कलाकार नावारूपाला येतो अशा वेळी लहान वयातच ही कला आत्मसात करावी असे प्रतिपादन कोळी यांनी शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना सांगितले.

या शिबिरात कमीत कमी व उपलब्ध असलेल्या साहित्याचा वापर करून कलाकृती निर्माण करताना विद्यार्थ्यांना चप्पल पासून तयार केलेले फूल खूपच आकर्षक ठरले.

शिबिराच्या शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त गुणांना वाव देताना विविध सामाजिक विषयावर कलाकृती सादर केल्या. या वेळी विद्यार्थ्यांनी दाखवलेला आत्मविश्वास, नाट्य कौशल्य, विविध गुण व पैलू तसेच सर्वांसमोर कला सादर करण्याची निर्भीडपणा व धाडस दाखवून सहभागी विद्यार्थ्यांनी वाहवा मिळवली.

या शिबिराच्या समारोप व पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गोवा राष्ट्र सेवा दल प्रमुख सुहास ठाकूर देसाई, पूज्य साने गुरुजी ज्ञानोपासाना मंदिर संस्थेचे अध्यक्ष विद्याधर शिरोडकर, उपाध्यक्ष यशवंत गावस, मुख्याध्यापिका सौ. वर्षा धुपकर, शिक्षक रौफ खान पठाण, विद्याधर उत्तम राऊत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना प्रशीस्थी पत्रक प्रदान करण्यात आले . या प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले.

आठवडा भर चाललेल्या या शिबिरात शाळेच शिक्षक वर्षा चोडणकर, मिलन परब, अनिशा परमेकर, अनुरा आमोणकर, मितेश गावकर,शिल्पा प्रभू गावकर,अन्वी नावेलकर, फरीदा पठाण, शिक्षेत्तर कर्मचारी सुरेंद्र नाईक, अजय पावसकर, सगुण पवार यांनी हे शिबीर यशस्वी करण्यात मोठे योगदान दिले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन रौफ खान पठाण यांनी तर आभार प्रदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ वर्षा धूपकर यांनी केले.

जि. प. खेमराज विद्यालय आरोंदा नं. २च्या पर्यावरण समृद्धीसाठी अनोखा उपक्रम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

आरोंदा, दि. २९: आरोंदा येथील जि. प. खेमराज विद्यालय नं. २ च्या मुलांनी एप्रिल महिन्यामध्ये विविध फळांच्या, फुल झाडांच्या बिया उन्हामध्ये चांगल्या सुकविल्या. या बिया, माती आणि शेण यांमध्ये मिसळून त्यांचे छोटे छोटे बॉल्स बनवून ते सुकवित त्याला संजीवनी बॉल्स असे नाव दिले. हे संजीवनी बॉल्स जून महिन्यांमध्ये डोंगर माळरानावर मुलांनी फेकून दिले.

डोंगरावर फेकलेले ह्या बॉल्समधील बिया आता जमिनीत रुजतील आणि त्यांची रोपे तयार होतील. या कृतीतून मुलांना कृतीयुक्त शिक्षणातून पर्यावरण समृद्धीचे शिक्षण मिळाले आणि त्यांना आनंदही मिळाला. हे संजीवनी बॉल्स बनविण्यासाठी खेमराज विद्यालयाच्या अंगणवाडी सेविका सौ नम्रता नाईक, सौ. अंकिता नाईक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. तनुजा नाईक, सहकारी शिक्षक भगवान पारधी व शाळेचे मुख्याध्यापक संदीप निऊंगरे यांनी मुलांना मार्गदर्शन व सहकार्य केले.

IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR- II OF PERNEM TALUKA PERNEM - GOA

Case No : JM-II/TNC-NEG/24/2024

1. Shri Tarachand Motilalji Malviya 2. Mrs. Mohini Tarachand Malviya, Both r/o. Plot No. 30/98, Ground Floor, Dangui Colony, VP Dhargal, Pernem, Goa.

...Applicants

V/s

1. Smt. Vatsala Manohar Talavanekar 2. Shri. Krishna Manohar Talavanekar 3. Mrs. Radhika Krishna Talavanekar 4. Shri. Popat Manohar Talavanekar 5. Mrs. Rakshana Popat Talavanekar 6. Shri Shantaram Manohar Talavanekar 7. Shri Vinayak Manohar Talavanekar 8. Mrs.Vinanti Vinayak Talavanekar 9. Mrs. Rashmi Rajesh Chodankar 10. Shri Rajesh Datta Chodankar All r/o. H.No.309, Mahakhajan, Dhargal, Pernem, Goa. .....Opponents.

To, The all Opponents,

PUBLIC NOTICE

WHEREAS the above named applicant have filed an application under section 7 of the Goa Daman & Diu Agricultural Tenancy Act 1969 in this court against you for Negative Declaration of the property Surveyed under survey No. 30/17 & 30/57 situated in the village of Dhargalim, Pernem — Goa.

WHEREAS the notices send to the above opponent is returned back with postal remarks "Not known returned to sender.

AND WHEREAS the applicant vide his application dated 12/03/2025 alongwith affidavit have stated that she is unaware about the fresh address of the unserved opponent nor is aware of the whereabouts of the unserved opponent and has prayed to serve the said opponent through publication in the newspaper.

AND WHEREAS after considering the request of the applicant, I have come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in the newspaper in Goa.

NOW THEREFORE notice is hereby given under ORDER V RULE 20 (I-A) OF CPC 1908 to opponents to appear in this court on **03/07/2025 at 10.30 am** in person or through duly authorized agent failing which ex-prate order shall be passed and matter shall be decided in her absence.

Give under my hand and seal of this Court on this 19th day of June, 2025.

Sd/- (Pravind J. Gawas) Seal

Joint Mamlatdar I of Pernem Taluka, h/c of Joint Mamlatdar II of Pernem Taluka Pernem — Goa.

श्री नवदुर्गा हायस्कूल उत्तम संस्कारांचे केंद्र ठरणार : तानावडे

■ *टीम दैनिक हेराल्ड*

खासदार सदानंद तानावडे यांचा सत्कार करताना , डावीकडून अशिता गांवस, भालचंद्र गांवस, रघुवीर वर्दे, शंकर दळवी.

डिचोली, दि. २९: शंभर टक्के निकालाची १२ वर्षे पूर्ण करत असल्याने शारदा एज्युकेशनल सोसायटी संचालित श्री नवदुर्गा विद्यालयातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तसेच मुख्याध्यापक, मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. हा सत्कार समारंभ पाळी येथील श्री नवदुर्गा मंदिराच्या सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला.

सभागृहामध्ये सर्व मान्यवरांसह ग्रामस्थही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान प्रमुख पाहुणे खासदार सदानंद शेट तानावडे यांनी दहावीत चांगले गुण मिळवत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना स्वतःची 'सक्सेस स्टोरी' इतरांमध्ये न शोधता आपण काही करत असताना किती कष्ट घेतो याचे मूल्यमापन करून पुढचे पाऊल टाका! असे मार्गदर्शन केले. तसेच आपल्या जीवनातील संघर्षाचे काही प्रसंग सांगून सर्वांनी कोणत्या स्तरावर स्वपरीक्षण करावे याबद्दल प्रेरणादायी भाषण केले. पाळी कोठंबी सारख्या ग्रामीण भागातील शैक्षणिक विकासाबरोबरच श्री नवदुर्गा हायस्कूल खेळ क्षेत्रात गोवा राज्यात अव्वल कामगिरी करणारे विद्यालय ठरत आहे ही फार कौतुकास्पद गोष्ट आहे. यावरून येथील शिक्षक किती कष्ट घेऊन कार्यरत आहेत हे समजते. त्यामुळे हे एक उत्तम संस्कारांचे केंद्र ठरणार हे निश्चित आहे असे प्रतिपादन तानावडे यांनी केले. त्यांनी श्री नवदुर्गा हायस्कूलच्या सर्व शिक्षकांचे आणि पालकांचेही अभिनंदन केले.

या समारंभासाठी व्यासपीठावर निमंत्रित पाहुणे म्हणून पाळी कोठंबी पंचायतीचे पंच सदस्य तथा समाजसेवक गणेश पाटवळकर, संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र गावस, उपाध्यक्ष दामोदर प्रभूदेसाई, व्यवस्थापक शंकर दळवी, सचिव रघुवीर वर्दे तसेच सदस्य राजू पैदरकर, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष सौ. अशीता गावस, खजिनदार सौ. रूपाली गावडे, सौ. दीपाली देविदास, नितेश नाईक, भिंगो गावस, श्री नवदुर्गा सोसायटीचे अध्यक्ष मंगेश गावस आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक सर्वेश कोटकर उपस्थित होते.

यावेळी श्री नवदुर्गा हायस्कूलमधून एस. एस.सी. मध्ये प्रथम क्रमांक सिद्धी गावडे ९०.२ टक्के, द्वितीय क्रमांक रूद्धी गावस ८७.७ टक्के, तृतीय क्रमांक गौरवी गावडे ८२.२ टक्के यांचे व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करून गौरविण्यात आले.

दरम्यान, राज्यसतरावर चॅम्पियन १७ वर्षाखालील मुलींचा खो-खो संघ, १४ वर्षाखालील मुलांचा खो-खो संघ, राज्यस्तरावर ८०० मी धावणे द्वितीय सानिका गावडे, भवानी गावडे यांचेही अभिनंदन करण्यात आले. तसेच ज्यांनी विद्यालयाच्या माध्यमातून मुलांना वेळोवेळी मार्गदर्शिन केले त्या सौ. निता देसाई, शिक्षिका सौ. छाया देसाई,सौ. शिप्रा सावंत, प्रियांका गावस, संपुर्णा सोलयेकर, सौ. श्रावणी पेळपकर, सौ. शमिका गावस, शिक्षक हनुमंत मायणीकर, सर्वेश तिळवे, राया पावणे, सचिन सुतार, रक्षा गांवस, सौ. शमिका गांवस, सौ. तेजस्वी गांवस तसेच संगीत शिक्षक रुपेश न्हावेलकर आणि सुजल उसगावकर, सौ. विशाका आंबेशकर, विनोद गावडे, अंकेश तळेकर या सर्वांना मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक प्रदान करून सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे शारदा एज्युकेशनल सोसायटीच्या वतीने राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे यांचाही सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या ईशस्तवन व स्वागतपर नृत्याने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ. उन्नती परब गावकर यांनी, प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक सर्वेश कोटकर यांनी तर संस्थेच्या वतीने रघुवीर वर्दे यांनी सर्वांचे स्वागत केले. आभारप्रदर्शन शिक्षक सर्वेश तिळवे यांनी केले. वंदे मातरम गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

हरमल नवरात्रौत्सव उत्सव समितीच्या अध्यक्षपदी भूमी नाईक

हरमल नवरात्रौत्सव मंडळाची कार्यकारिणी अध्यक्ष भूमी भरत नाईक (मध्यभागी)व अन्य पदाधिकारी.

■ *टीम दैनिक हेराल्ड*

हरमल, दि. २९ : येथील नवरात्रौत्सव मंडळाची सर्वसाधारण बैठक नुकतीच होऊन आगामी उत्सवासाठी भूमी भरत नाईक यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.बैठकीच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष अनंत गडेकर होते.

उत्सव समितीच्या पदाधिकारी उपाध्यक्ष सिद्धी सदानंद नाईक,सचिव भविता भावेश गडेकर,उपसचिव राजलक्ष्मी अशोक वस्त,खजिनदार पौर्णिमा नितेश धारगळकर उप खजिनदार पुष्पा नारायण बर्डे यांची निवड करण्यात आली.ह्यावेळी कार्यक्रमाध्यक्ष सिद्धी गणेश नाईक व विसर्जन समिती अध्यक्ष गजानन तारी,रामचंद्र केरकर व आत्माराम कोरकणकर यांची निवड करण्यात आली.